SAMPLE CONTENT

## मराठी (HL)

# व्याकरण – भाषाभ्यास

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित



प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

## इयत्ता दहावी
(मराठी व सेमी इंग्रजी माध्यम)

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.

# मराठी (HL)

# व्याकरण व भाषाभ्यास

## इयत्ता दहावी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तक व कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.
- कृतिपत्रिका आराखड्यातील भाषाभ्यास विभागाचे सविस्तर विवेचन.
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण.
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत सर्व घटकांचा परिपूर्ण सराव.
- उत्तरे लिहिण्याकरता पर्याप्त जागा उपलब्ध.
- स्वयंमूल्यमापनाकरता या विभागावर आधारित नमुना कृतिपत्रिका समाविष्ट
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरता उत्तरसूची समाविष्ट.
- बोर्ड कृतिपत्रिका मार्च (२०१९, २०२०, २०२२, २०२३ व जुलै २०२३) मधील निवडक प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007 | **TEID: 3306** | P.O. No. 11017

## प्रस्तावना

इयत्ता दहावीचे वर्ष हा विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीचा निर्णायक टप्पा असतो. त्यामुळे, परीक्षेत उत्तम गुण मिळवून यशाची दारे उघडण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. भाषेमध्ये आपल्याला अधिकाधिक गुण कसे मिळवता येतील? असा प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात येतोच. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी निर्धारित केलेल्या कृतिपत्रिका आराखड्यानुसार मराठी विषयातील तब्बल १६ गुण हे या व्याकरण व भाषाभ्यास विभागाला देण्यात आले आहेत, म्हणजेच बोर्डाच्या लेखी परीक्षेतील सुमारे २०% गुण या विभागास देण्यात आले आहेत. या घटकांचा अभ्यास व सराव ही मराठी विषयाच्या यशाची गुरुकिल्ली निश्चितच ठरू शकेल. विद्यार्थ्यांच्या या यशोमार्गावरील हाच प्रवास सुखकर करण्याकरता, त्यांना खऱ्या अर्थाने भाषेवर प्रभुत्व मिळवता यावे याकरता **लेझी बोन एज्युकेशनचे मराठी (HL) व्याकरण व भाषाभ्यास: इयत्ता दहावी** हे पुस्तक मुलांच्या, हाती सोपवताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

व्याकरण हा भाषेचा पाया असतो. हा पाया मजबूत असेल, तर भाषेचा सुंदर डोलारा येथे उभा करता येतो. व्याकरण व अनेकविध भाषिक घटकांनी भाषा घडलेली असते. त्यांचा अभ्यास करून भाषेवर प्रभुत्व मिळवणे अधिक सोपे होते. शिवाय, व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणे सहज शक्य असते; मात्र त्याकरता गरज असते ती व्याकरणिक व भाषिक घटकांमागील मूळ संकल्पना समजून घेऊन त्या घटकांचा पुरेसा सराव करण्याची. विद्यार्थ्यांची हीच गरज लक्षात घेऊन आम्ही या संकल्पना सहज, सोप्या शब्दांत मांडल्या आहेतच. शिवाय, सरावाकरता भरपूर प्रश्न समाविष्ट करून त्यांची उत्तरे लिहिण्याकरताही पुरेशी जागा दिली आहे. या पुस्तकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची व्याकरण व भाषाभ्यासावरील पकड मजबूत होईल असा आम्हांला विश्वास आहे.

कृतिपत्रिकेतील भाषाभ्यास विभागाचा आराखडा समजावून देऊन ते प्रश्न कसे सोडवावेत याचे सविस्तर विवेचन या पुस्तकात देण्यात आले आहे. त्यामुळे, कृतिपत्रिका सोडवताना काय काळजी घ्यावी, प्रत्येक घटकासाठी निर्धारित केलेले गुण, पाळायच्या व टाळायच्या सर्व बाबी मुलांना लक्षात येतील. बोर्ड कृतिपत्रिका मार्च (२०१९, २०२०, २०२२, २०२३ व जुलै २०२३) मध्ये विचारण्यात आलेल्या निवडक प्रश्नांचा उत्तरांसह समावेश केल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेत कशा प्रकारे प्रश्न विचारले जातात याचा अंदाज येईल.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित विपुल कृतींचा अभ्यास झाल्यानंतर व्याकरण व भाषाभ्यासात मुलांना पैकीच्या पैकी गुण मिळवणे सहज शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** द्वितीय

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी कुमारभारती; पाचवे पुनर्मुद्रण: २०२३' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | | |
| | कृतिपत्रिका आराखडा | | १ |
| | कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन | | २ |
| • | **व्याकरण** | | |
| १. | समास | | ३ |
| २. | शब्दसिद्‌धी | | १३ |
| ३. | वाक्प्रचार | | २१ |
| • | **भाषिक घटक** | | |
| १. | शब्दसंपत्ती | | |
| | • | समानार्थी शब्द | ३६ |
| | • | विरुद्‌धार्थी शब्द | ४४ |
| | • | वचन | ५० |
| | • | शब्दसमूहाबद्‌दल एक शब्द | ५६ |
| | • | शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे | ६० |
| २. | लेखननियमांनुसार लेखन | | ६३ |
| ३. | विरामचिन्हे | | ७१ |
| ४. | पारिभाषिक शब्द | | ७६ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – १ | | ७९ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – २ | | ८१ |
| | उत्तरे | | ८३ |


Sample Content

# व्याकरण व भाषाभ्यास

Sample Content

# कृतिपत्रिका आराखडा – विभाग ४ - भाषाभ्यास

**एकूण गुण १६**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

१) समास – द्विगू , कर्मधारय, द्वंद्व (वैकल्पिक द्वंद्व, समाहार द्वंद्व, इतरेतर द्वंद्व) २ गुण

२) शब्दसिद्धी – शब्द – प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त २ गुण

३) वाक्प्रचार – (४ वाक्प्रचार कृती देणे व त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित) ४ गुण

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

कृतिपत्रिकेत ४ वाक्प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडविणे अपेक्षित

प्रत्येक वाक्प्रचाराचा अर्थ – १ गुण

प्रत्येक वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग – १ गुण

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

अ) समानार्थी शब्द

ब) विरुद्धार्थी शब्द

क) एकवचन / अनेकवचन
वचन बदला / वचन ओळखा

ड) शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहिणे –
(तीन शब्दसमूह देणे त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित)

ई) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे

} यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

अचूक शब्द ओळखा – (कोणतेही ६ शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे, पर्यायातील ४ पैकी एकच शब्द (लेखननियमांनुसार) अचूक असावा. (वरील ६ शब्दांपैकी ४ शब्द सोडवणे अपेक्षित)

किंवा

वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा. प्रत्येक वाक्यात २ शब्द लेखननियमांनुसार चुकीचे असतील अशी ४ वाक्ये देणे. त्यांपैकी (२ वाक्ये सोडवणे अपेक्षित).

**(३) विरामचिन्हे** १ गुण

१) योग्य विरामचिन्हे वापरा.
२) विरामचिन्हे ओळखा.
३) चुकीची विरामचिन्हे बदला.

} यांपैकी ०१ गुणासाठी कोणतीही एक कृती विचारणे

**(४) पारिभाषिक शब्द** १ गुण

गद्य, पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित कोणतेही २ पारिभाषिक शब्द देणे व दोन्ही सोडवणे अपेक्षित (प्रत्येक शब्दासाठी १/२ गुण)

Sample Content

## कृतिपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन – विभाग ४ - भाषाभ्यास

**प्र.४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** **[एकूण गुण ८]**

कृतिपत्रिकेत भाषाभ्यास विभागातील **प्र.४. (अ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे व्याकरणिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे:

१. समास **२ गुण**

यामध्ये सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखणे, सामासिक शब्द व समासांच्या जोड्या जुळवणे, विग्रह व समास लिहून कोष्टक पूर्ण करणे, वाक्यातील सामासिक शब्द ओळखून विग्रह करणे इत्यादी प्रकारच्या कृती विचारण्यात येतील.

२. शब्दसिद्धी **२ गुण**

यामध्ये प्रत्यय लावून शब्द तयार करा, उपसर्ग लावून शब्द तयार करा, दिलेल्या शब्दांचे उपसर्गघटित-प्रत्ययघटित-अभ्यस्त यांमध्ये वर्गीकरण करा इत्यादी प्रकारच्या कृती विचारण्यात येतील.

३. वाक्प्रचार **४ गुण**

यामध्ये 'दिलेल्या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे' या प्रकारची कृती विचारण्यात येईल. चार वाक्प्रचार देण्यात येतील व कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे अपेक्षित आहे. (अर्थासाठी प्रत्येकी १ गुण व वाक्यात उपयोगासाठी १ गुण)

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही. फक्त वाक्प्रचाराच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे.

**प्र.४. (आ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** **[एकूण गुण ८]**

कृतिपत्रिकेतील भाषाभ्यास विभागात **प्र.४. (आ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी भाषिक घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे भाषिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे:

१. शब्दसंपत्ती **४ गुण**

यामध्ये समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दसमूहांबद्दल एक शब्द, वचन बदला / वचन ओळखा, शब्दातील अक्षरांपासून शब्द बनवणे इत्यादींसारख्या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर कृती विचारण्यात येतील.

२. लेखननियमांनुसार लेखन **२ गुण**

यामध्ये पुढील कृती विचारण्यात येतील:

अचूक शब्द ओळखा (कोणतेही सहा शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देण्यात येतील. त्यांपैकी ४ शब्द सोडवणे अपेक्षित आहे.)

वाक्य लेखननियमांनुसार लिहा (चार वाक्ये देण्यात येतील. प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देण्यात येतील व त्यांपैकी कोणतीही २ वाक्ये दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित आहे.)

प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण व वाक्यातील प्रत्येक चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी १/२ गुण दिला जाईल.

३. विरामचिन्हे **१ गुण**

यामध्ये योग्य विरामचिन्हे वापरा, विरामचिन्हे ओळखा, चुकीची विरामचिन्हे बदला इत्यादी कृतिप्रकार विचारण्यात येतील.

४. पारिभाषिक शब्द **१ गुण**

यामध्ये गद्य-पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित कोणतेही २ शब्द देण्यात येतील व दोन्ही सोडवणे अपेक्षित आहे. प्रत्येक शब्दासाठी १/२ गुण असेल.

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही. लेखननियमांनुसार लेखन या घटकामध्ये अंतर्गत विकल्प असेल. तसेच, शब्दसमूहाबद्दल एक शब्द यामध्ये अंतर्गत विकल्प असेल.

Sample Content

# १ समास

'सम् + अस्' या संस्कृत धातूपासून 'समास' या शब्दाची निर्मिती झाली असून त्याचा अर्थ 'एकत्र करणे' असा होतो. **दोन किंवा अधिक शब्द एकत्र करून नवीन जोडशब्द तयार करणे म्हणजे समास होय.** यात शब्दांचा काटकसरीने वापर केलेला आढळतो.

दैनंदिन जीवनात परस्परांशी संवाद साधताना आपल्या भावना, विचार, कल्पना व्यक्त करण्यासाठी आपण काही जोडशब्दांचा वापर करतो. अनेकवेळा एका संपूर्ण वाक्याचे काम हे जोडशब्द करून जातात. त्यामुळे, कमी शब्दांत अधिक अर्थ व्यक्त होतो व भाषेचे सौंदर्य खुलून येते. हे जोडशब्द वर्षानुवर्षे भाषेत प्रचलित असल्याने सामान्यपणे त्या पूर्ण वाक्याऐवजी याच शब्दांचा भाषेत वापर केला जातो.

उदा. 'साखर घालून केलेला भात' असे म्हणण्यापेक्षा आपण 'साखरभात' असे म्हणतो. 'परम असा ईश्वर' याऐवजी 'परमेश्वर' या एका शब्दाच्या वापराने बोलणाऱ्याचे भाव समोरच्या व्यक्तीपर्यंत अचूकपणे पोहोचतात.

**सामासिक शब्द:**

दोन किंवा अधिक शब्दांच्या एकत्रिकरणातून जो एक नवीन जोडशब्द तयार होतो त्या शब्दाला **सामासिक शब्द** असे म्हटले जाते.

**उदा.** 'आई आणि वडील' यांपासून 'आईवडील' हा सामासिक शब्द तयार होतो.

**विग्रह:**

किमान शब्दांत सामासिक शब्दांची केलेली अचूक फोड म्हणजे त्या शब्दाचा **विग्रह** होय. यात सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला आहे हे त्या जोडशब्दाची फोड करून स्पष्ट होते.

**उदा.** 'त्रिकोण' या सामासिक शब्दाचा विग्रह 'तीन कोनांचा समूह' असा होतो.

व्याकरणामध्ये समास ओळखणे, सामासिक शब्द सांगणे व समासाचा विग्रह करणे या तीन्ही प्रक्रिया महत्त्वाच्या असतात.

**विशेष माहिती**

- एकाच सामासिक शब्दाचे विग्रह वेगवेगळ्या प्रकारे करता येणे शक्य असते. अशावेळी अर्थ ध्यानात घेऊन त्याचा विग्रह करणे व समास निश्चित करणे आवश्यक ठरते.

  **उदा.** अनंत – अंत नसलेला – नञ् तत्पुरुष समास

  अनंत – नाही अंत ज्याला असा तो (परमेश्वर) – नञ् बहुव्रीही समास

- बऱ्याच वेळा समास आणि संधी या दोन व्याकरणिक घटकांमध्ये विद्यार्थ्यांचा गोंधळ उडतो. या दोन प्रकारांमध्ये सूक्ष्म असा फरक आहे हे नेहमी लक्षात ठेवावे.

  संधी करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळले जातात व त्या दोहोंच्या बदल्यात एक नवा वर्ण तयार होतो.

  **उदा.** चंद्रोदय = चंद्र + उदय

  या शब्दांच्या एकत्रिकरणाच्या वेळी चंद्र शब्दातील शेवटचा वर्ण 'अ' हा उदय शब्दातील आद्यवर्ण 'उ' मध्ये मिसळून त्यापासून **ओ** हा नवा वर्ण तयार होतो.

  सामासिक शब्दाचा विग्रह करताना मात्र त्याला काही प्रत्ययांची किंवा काही शब्दांची जोड दिली जाते.


  **उदा.** चंद्रोदय – चंद्र**ाचा** उदय

- समासात कमीत कमी दोन शब्द येतात. या शब्दांनाच 'पदे' असे म्हटले जाते. सामासिक शब्दातील कोणत्या पदाला अर्थाच्या दृष्टीने प्राधान्य दिले आहे, यावरून समासाचा प्रकार ठरतो.

  **उदा.** रागलोभ – राग (पहिले पद) लोभ (दुसरे पद)

Sample Content

**समासाचे प्रकार पुढीलप्रमाणे:**




यावर्षी आपण कर्मधारय समास, द्विगू समास व द्वंद्व समास (इतरेतर द्वंद्व, वैकल्पिक द्वंद्व आणि समाहार द्वंद्व) यांचा अभ्यास करणार आहोत.

## १. कर्मधारय समास

ज्या समासातील दोन्ही पदे प्रथमा विभक्तीत असतात त्या समासास **कर्मधारय समास** असे म्हणतात.

### वैशिष्ट्ये

- कर्मधारय समास हा तत्पुरुष समासाचा एक प्रकार आहे.
- या समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत (प्रथमा) असतात.
- या समासातील पदांमध्ये विशेषण-विशेष्य, विशेषण-विशेषण किंवा उपमान-उपमेय असा संबंध असतो.
- कधी यातील पूर्वपद विशेषण असते.
  **उदा:** पीतांबर – [**पीत** (विशेषण) असे अंबर (नाम)]
- तर कधी यातील दुसरे पद विशेषण असते.
  **उदा:** घननीळ – [**निळा** (विशेषण) असा घन (नाम)]
- कधी दोन्हीही पदे विशेषणे असतात.
  **उदा.** पांढराशुभ्र – [**शुभ्र** (विशेषण) असा **पांढरा** (विशेषण)]
- कधी कधी पदांमधील संबंध उपमान - उपमेय असेही असते.
  **उदा.** चरणकमल – [**कमळासारखे** (उपमेय) **चरण** (उपमान)]
- कधी कधी दोन्ही पदे ही एकरूप असतात.
  **उदा.** काव्यामृत – (काव्यरूपी अमृत).

Sample Content

Page no. **5** to **82** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# उत्तरे

## व्याकरण

### १. वाक्यांचे प्रकार

कृ.१.

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| i. | नवग्रह | **नऊ ग्रहांचा समूह** | **द्विगू समास** |
| ii. | सासूसासरे | **सासू व सासरे** | **इतरेतर द्वंद्व समास** |
| iii. | एकदोन | **एक किंवा दोन** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| iv. | पंचतत्त्व | **पाच तत्त्वांचा समूह** | **द्विगू समास** |
| v. | कमीअधिक | **कमी आणि अधिक** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| vi. | सप्तपाताळ | **सात पाताळांचा समूह** | **द्विगू समास** |
| vii. | कौरवपांडव | **कौरव आणि पांडव** | **इतरेतर द्वंद्व समास** |
| viii. | साधूसंत | **साधू, संत तत्सम महान व्यक्ती** | **समाहार द्वंद्व समास** |
| ix. | त्रिदेव | **तीन देवांचा समूह** | **द्विगू समास** |
| x. | नरनारी | **नर आणि नारी** | **इतरेतर द्वंद्व समास** |

कृ.२.

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | दशदिशा | **दहा दिशांचा समूह** | द्विगू समास |
| ii. | लेकीसुना | लेकी आणि सुना | **इतरेतर द्वंद्व समास** |
| iii. | **सुखदु:ख** | सुख किंवा दु:ख | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| iv. | पंचधातू | **पाच धातूंचा समूह** | द्विगू समास |
| v. | शेतीवाडी | **शेती, वाडी वगैरे तत्सम संपत्ती** | **समाहार द्वंद्व समास** |
| vi. | **कपबशी** | कप आणि बशी | **इतरेतर द्वंद्व समास** |
| vii. | स्थित्यंतर | **इतर स्थिती** | **कर्मधारय समास** |
| viii. | **सद्गुण** | सत् असे गुण | **कर्मधारय समास** |
| ix. | **बापलेक** | बाप आणि लेक | **इतरेतर द्वंद्व समास** |

कृ.३.

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| i. | **मिष्टान्न** | **मिष्ट असे अन्न** | **कर्मधारय समास** |
| ii. | **सप्तसिंधू** | **सात सिंधूंचा समूह** | **द्विगू समास** |
| iii. | **सुंठसाखर** | **सुंठ व साखर** | **इतरेतर द्वंद्व समास** |
| iv. | **महर्षी** | **महान असे ऋषी** | **कर्मधारय समास** |
| v. | **पंचतत्त्व** | **पाच तत्त्वांचा समूह** | **द्विगू समास** |
| vi. | **दानधर्म** | **दान हाच धर्म** | **कर्मधारय समास** |
| vii. | **आवडनिवड** | **आवड आणि निवड** | **इतरेतर द्वंद्व समास** |
| viii. | **शंभरदीडशे** | **शंभर किंवा दीडशे** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |

Sample Content

**कृ.४.** i. महासभा, ज्ञानदान ii. चौघडी, पंचकोन iii. मायलेक, प्रश्नोत्तरे
iv. दोनचार, स्पृश्यास्पृश्य v. बाजारहाट, सखेसोबती

**कृ.५.** (i - क), (ii - अ), (iii - इ), (iv - ब), (v - ड)

**कृ.६.** i. महाराष्ट्र – महान असे राष्ट्र ii. भाषांतर – अन्य भाषा iii. पांढराशुभ्र – शुभ्र असा पांढरा

**कृ.७.** i. त्रिभुवन ii. नवरात्र iii. सप्ताह

**कृ.८.**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| i. | रक्तचंदन | **रक्तासारखे चंदन** |
| ii. | घनश्याम | **घनासारखा श्याम** |
| iii. | काव्यामृत | **काव्यरूपी अमृत** |
| iv. | पुरुषोत्तम | **उत्तम असा पुरुष** |
| v. | अष्टाध्यायी | **अष्ट (आठ) अध्यायांचा समूह** |

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| vi. | पंचपाळे | **पाच पाळ्यांचा समूह** |
| vii. | द्विदल | **दोन दलांचा समूह** |
| viii. | बारभाई | **बारा भाईंचा समूह** |
| ix. | त्रैलोक्य | **तीन लोकांचा समूह** |

**कृ.९.**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| i. | **बहीणभाऊ** | **बहीण व भाऊ** | **इतरेतर द्वंद्व समास** |
| ii. | **खरेखोटे** | **खरे किंवा खोटे** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| iii. | **मीठभाकर** | **मीठ, भाकर वगैरे** | **समाहार द्वंद्व समास** |
| iv. | **सत्यासत्य** | **सत्य किंवा असत्य** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| v. | **चारपाच** | **चार किंवा पाच** | **वैकल्पिक द्वंद्व समास** |
| vi. | **भाजीपाला** | **भाजी, पाला, मिरची, कोथिंबीर यांसारख्या वस्तू** | **समाहार द्वंद्व समास** |
| vii. | **अ. कपडालत्ता** | **कपडे, चादरी इत्यादी गोष्टी** | **समाहार द्वंद्व समास** |
| | **ब. अन्नपाणी** | **अन्न, पाणी व इतर खाण्यापिण्याच्या गोष्टी** | **समाहार द्वंद्व समास** |

**कृ.१०.**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| i. | नाकडोळे | **नाक व डोळे** |
| ii. | सुंठसाखर | **सुंठ व साखर** |
| iii. | कृष्णार्जुन | **कृष्ण व अर्जुन** |
| iv. | विटीदांडू | **विटी व दांडू** |

**कृ.११.**

| क्र. | सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|---|
| i. | विटीदांडू | **इतरेतर द्वंद्व समास** |
| ii. | नीलकमल | **कर्मधारय समास** |
| iii. | पंचपाळे | **द्विगू समास** |
| iv. | वेणीफणी | **समाहार द्वंद्व समास** |

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)


## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) – SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) – SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App



Explore our range of STATIONERY


Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Address:
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15
Website: www.targetpublications.org
Email: mail@targetpublications.org


Visit Our Website